'ॲसिड रिफ्लक्स' टाळण्यासाठी लवकर जेवा!

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : रात्री जड जेवण झाल्यास बऱ्याचदा पित्त घशात येण्याचा (ॲसिड रिफ्लक्स) त्रास होऊ शकतो. त्यामुळे रात्रीची झोप खराब होते. याबाबत कोकिलाबेन अंबानी हॉस्पिटलचे गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. दत्तात्रय सोळंके यांनी सांगितले की, गॅस्ट्रो-एसोफेजियल रिफ्लक्स डिसीज (जीईआरडी) हा एक जुनाट पाचक रोग आहे. पोटातून अन्ननलिकेमध्ये वारंवार पित्त येण्यामुळे तो होतो. ॲसिड रिफ्लक्स अन्ननलिकेच्या अस्तरांना दुखापत करते. याची लक्षणे सामान्यतः छातीत जळजळ, घशात किंवा तोंडात पित्ताची आंबट किंवा कडू चव येते, छातीत दुखणे, अन्न घशात अडकल्याची शंका, तीव्र खोकला किंवा कर्कशपणा अशी आहेत.

कॉस्मो उद्योग लोन
व्याजदर फक्त 8%* पासून पुढे
कॅश क्रेडिट स्वरुपात कर्ज उपलब्ध
*बदलू (ROI p.a.)
दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.
Toll Free No.: 1800 233 0234

डॉ. सोळंके यांच्या मते, जीईआरडीमुळे खालच्या अन्ननलिकेतील शेवटी असलेले स्नायू वलय कमकुवत किंवा शिथिल असते, ज्यामुळे पोटातील आम्ल बाहेर पडते. यासाठी लठ्ठपणा, धूम्रपान, काही प्रकारचे अन्न, विशिष्ट औषधे आणि तणाव कारणीभूत असतो. जेव्हा पोटातील ॲसिड अन्ननलिकेमध्ये परत येते तेव्हा छातीत जळजळ, तोंडात आंबट, कडवटपणा आणि कधी कधी अस्वस्थता यासारखी लक्षणे दिसू शकतात. असेच राहिल्यास त्यामुळे पचनक्रियेतही व्यत्यय येतो आणि झोपेत त्रास होतो. त्यामुळे दुसऱ्या दिवशी थकवा आणि विक्षिप्त अनुभव येतो.

यावर उपाय सुचवताना डॉ. सोळंके सांगतात की, झोपताना तुमचे डोके उंच करा, रात्री उशिरा खाणे टाळा, तुमच्या डाव्या कुशीवर झोपा, अधिक त्रास जाणवत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या, असेही डॉ. सोळंके यांनी सुचवले आहे.

डॉ. रुचाज् तन्वी हर्बल्स क्लिनिक आणि नवतेज पंचकर्म सेंटर
Dr. Rucha's Tanvi CLINIC
FREE नाडीपरीक्षण चेकअप
तज्ज्ञ डॉक्टरांकडून योग्य मार्गदर्शन. आजच नाव नोंदवा
ठाणे डॉ. स्मिता देशपांडे स. 11 ते दु 1 वा.
दादर डॉ. सुजाता जोशी स. 11 ते दु 1 वा.
डॉ. रुचा पै यांना भेटा
ठाणे : सायं. 6 ते 8 वा.
दादर : 3 रा शनि. दु.11 ते 1
अपॉइंटमेंट आवश्यक आरोग्यसत्ता 9920975892
आजच अपॉइंटमेंट बुक करा. 9082911530

सोलापूर विमानसेवेला लवकरच मुहूर्त

प्रशासनाकडून आवश्यक बाबींची पूर्तता

लोकसत्ता प्रतिनिधी

सोलापूर : सोलापूरच्या बहुप्रतीक्षित विमानसेवेचा लांबलेला मुहूर्त लवकरच ठरणार असून, त्या दृष्टीने प्रशासनाकडून आवश्यक सर्व बाबींची पूर्तता होत असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. ते म्हणाले, की सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी धार्मिक, ऐतिहासिक, कृषी व जलपर्यटन विकास पूर्णत्वास घेण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाची पावले पडत आहेत. या पर्यटन विकासासह स्थानिक उद्योग व्यवसायाला चालना मिळण्यासाठीच विमानसेवा लवकरात लवकर सुरू करण्याचा प्रयत्न आहे. त्या दृष्टीने प्रशासनाकडून आवश्यक सर्व बाबींची पूर्तता होत आली आहे. यानुसार येत्या महिनाभरात विमानसेवेला मुहूर्त लागण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

विधानसभा निवडणुकीपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सोलापूर विमानसेवेचे लोकार्पण झाले होते. प्रत्यक्षात भारतीय नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून (डीजीसीए) काही तांत्रिक परवाने मिळाले नव्हते. त्यांची पूर्तता करण्यात आली आहे. परंतु, आणखी काही किरकोळ तांत्रिक बाबींची पूर्तता करणे आवश्यक असल्याने विमानसेवेचा मुहूर्त लांबला आहे. हे सर्व झाल्यावर विमानसेवा सुरू होईल असे आशीर्वाद यांनी सांगितले. या वेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी (महसूल) अमृत नाटेकर, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के हे उपस्थित होते.

विमानसेवेची बहुप्रतीक्षा

सोलापूरचे विमानतळ आदमासे सुमारे ३५० एकर क्षेत्रात आहे. भविष्यकाळाचा विचार करता जवळच बोरामणी येथे आंतरराष्ट्रीय कार्गो विमानतळाची २००४ नंतर उभारणी सुरू झाली होती. त्यासाठी सुमारे दोन हजार एकर जमीन संपादितही झाली होती. परंतु, पुढे फारशी प्रगती झाली नाही. त्यामुळे जुन्या छोटेखानी विमानतळावरून विमानसेवा सुरू करण्याचा निर्णय झाला. येथून २००८ साली खासगी विमानसेवा सुरूही झाली. परंतु, पुढे ती थोड्याच कालावधीत बंद पडली. १५ जून २०२३ रोजी अडथळा असलेली चिमणी पाडण्यात आल्यानंतर विमानसेवा सुरू होण्याची अपेक्षा होती. त्यात पुन्हा तांत्रिक अडचणी आल्या. आता महायुती सरकारने मनावर घेत हा विषय पूर्णत्वाकडे नेला आहे. विमानतळाचे नूतनीकरण झाले. प्रत्यक्षात विमानसेवेची सोलापूरकरांना प्रतीक्षा आहे.

आळंदीत दोन अल्पवयीन मुलांवर अत्याचार

पिंपरी : आळंदी येथील एका खासगी शैक्षणिक संस्थेतील दोन अल्पवयीन मुलांवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी एकाला अटक केली असून, त्याला न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. एका महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पीडित मुलाच्या आईने आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आळंदी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके यांनी दिलेल्या माहितीनुसार, आळंदीत एका खासगी शैक्षणिक संस्थेत सहा विद्यार्थी शिक्षण घेतात. आरोपी मुलांसोबत वास्तव्यास होता. त्याने शनिवारी मध्यरात्री अडीचच्या सुमारास त्यांच्यावर अनैसर्गिक अत्याचार केला. याबाबत दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

शाहरुखची 'मन्नत' पूर्ण

दोन मजले वाढवण्यास पर्यावरण विभागाची मंजुरी

जयेश सामंत/ इंद्रायणी नार्वेकर

मुंबई : सुप्रसिद्ध अभिनेता शाहरुख खान याच्या वांद्रे येथील मन्नत बंगल्यावर आणखी दोन मजले वाढणार आहेत. राज्याच्या पर्यावरण विभागाने नुकतीच याबाबतच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे बंगल्याच्या विस्तारिकरणाची शाहरुखची 'मन्नत' अखेर पूर्ण होणार आहे.

बॉलिवूडचा स्टार असलेल्या शाहरुख खानचा वांद्रे येथील बंगला नेहमीच चर्चेत असतो. माउंट मेरीकडे जाणाऱ्या रस्त्यावरचा हा बंगला शाहरुखच्या चाहत्यासाठीही आकर्षणाचा विषय आहे. सध्या सहा मजल्यांचा असलेला हा बंगला आता लवकरच आणखी उंच होणार आहे. या बंगल्याच्या वर आणखी दोन मजले वाढण्यासाठी महाराष्ट्र सागरी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (एमसीझेडएमए) नुकतीच परवानगी दिली आहे. शाहरूखची पत्नी गौरी खान हिने या परवानगीकरिता संबंधित विभागाकडे अर्ज केला होता.

वांद्रे पश्चिम येथील पालिकेच्या एच पश्चिम विभागाच्या अखत्यारीत येणारा मन्नत या बंगल्याचे आता आणखी विस्तारिकरण करून त्यात काही बदल करण्यात येणार आहेत. या सहा मजली बंगल्याला २००२ मध्ये आयओडी तसेच २००६ मध्यवं भोगवटा प्रमाणपत्र मिळालेले आहे. त्यानंतर बंगल्यामध्ये तळघरात दोन मजले आणि जलतरण तलाव बांधण्यात आला व त्यालाही भोगवटा प्रमाणपत्र व सीआरझेड परवानगी मिळालेली आहे. त्यामुळे शाहरुखचे बंगल्याच्या विस्तारिकरणाचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या २०३४ च्या विकास आराखद्यानुसार हा बंगला निवासी भागात असून यावर कोणतेही आरक्षण नाही. बंगल्याच्या संपूर्ण भूखंडाचे क्षेत्रफळ २४४६.४० चौरस मीटर आहे. तर बंगल्याचे चटई क्षेत्रफळ २०९१.३८ चौरस मीटर आहे. बंगल्याच्या विस्तारिकरणानंतर आणखी ६१६.०२ चौरस मीटरने क्षेत्रफळ वाढणार आहे.

राज्यात स्वतंत्र १४ आयुष जिल्हा रुग्णालये

आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी उपचार देण्याचे धोरण

संदीप आचार्य, लोकसत्ता

मुंबई : राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत देशभरात आयुष जिल्हा रुग्णालये उभारून त्याच्या माध्यमातून आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी, तसेच योगा, निर्सगोपचार आणि वृद्धापकाळातील उपचार देण्याचे धोरण स्वीकारले असून त्याअंतर्गत राज्यात १४ स्वतंत्र आयुष जिल्हा रुग्णालये सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यापैकी अहमदनगर, पुणे व नंदूरबार येथे ३० खाटांच्या जिल्हा रुग्णालयांचे बांधकाम पूर्ण होऊन रुग्णालयांचे काम सुरू झाले आहे.

महाराष्ट्रात दोन ते पाच लाख लोकसंख्येसाठी ३० व ५० खाटांची १४ रुग्णालये सुरू करण्यास मान्यता देण्यात आली असून यासाठी बांधकामाचा खर्च १० ते १५ कोटी रुपये येणार असल्याचे आरोग्य विभागाच्या सूत्रांनी सांगितले. या रुग्णालयांमध्ये बाह्यरुग्णसेवा, तसेच रुग्णांना दाखल करून उपचार देण्यात येणार असून साधारणपणे प्रत्येक रुग्णालयात ६० ते ७० पदे असतील, तसेच विशेषज्ञांची सात पदे असणार आहेत. भारती जीवनपद्धतीत आयुर्वेदिक उपचार हे प्राचीन काळापासून अस्तित्वात असून आयुर्वेदिक उपचार पद्धतीने गुण येण्यास काहीसा विलंब होत असला, तरी आयुर्वेदिक उपचार घेण्याकडे कल वाढतो आहे. तसेच पंचकर्म करणाऱ्यांची संख्या वाढत असून आरोग्य विभागाच्या आयुष दवाखान्यांमध्येही मोठ्या प्रमाणात रुग्ण उपचार घेत असल्याचे आरोग्य विभागाच्या सूत्रांचे म्हणणे आहे.

त्याचप्रमाणे होमिओपॅथी उपचार घेणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. त्यामुळे आयुष जिल्हा रुग्णालयात रुग्ण मोठ्या संख्येने उपचारासाठी येतील, असा विश्वास आरोग्य विभागाच्या डॉक्टरांकडून व्यक्त करण्यात येत आहे. मंजूर असलेल्या १४ रुग्णालयांमध्ये ठाणे, नागपूर, जालना, धाराशिव, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, तसेच गडचिरोली येथे ५० खाटांचे रुग्णालय सुरू करण्यात येणार असून, जळगाव, वर्धा व गोंदिया जिल्ह्यात ३० खाटांची आयुष रुग्णालये सुरू केली जातील.

ठाण्यातील रुग्णालयासाठी १५ कोटी मंजूर

ठाण्यात जिल्हा आयुष रुग्णालय उभे राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

आयुष मंत्रालयाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय आयुष अभियानाअंतर्गत जिल्हा आयुष रुग्णालयाचे काम येत्या काही दिवसांतच सुरू होणार असल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार यांनी दिली. आयुष रुग्णालय बांधण्यासाठी १५ कोटी मंजूर झाले आहेत. वृद्धापकालीन (जेरियाट्रिक) रुग्णोपचाराचे महत्त्वही मोठे असून ॲलोपॅथीबरोबरच वृद्धापकाळात पर्यायी उपचार म्हणून आयुर्वेदिक, तसेच होमिओपॅथी औषधोपचार घेण्याकडे कल वाढत असून, या रुग्णालयांमध्ये त्याचा फायदा जेरियॅट्रिक रुग्णांना नक्कीच होईल, असा विश्वास आरोग्य विभागाच्या सूत्रांनी व्यक्त केला.

बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra एक परिवार एक बैंक
मुख्य कार्यालय: निगमित सेवा विभाग 'लोकमंगल', 1501, शिवाजीनगर, पुणे 411 005 फोन : 020-25537239/336
प्रस्तावासाठी विनंती (आरएफपी)
बँक ऑफ महाराष्ट्र त्यांच्या **सुप्रीम कोर्ट शाखा परिसर, दिल्ली अंचल येथे ऑटो व्हॉल्ट लॉकर्सचा पुरवठा करणे आणि बसवून देणे तसेच 5 वर्षे त्यांची सर्वसमावेशक देखभाल करणे''** या कामासाठी मोहोरबंद निविदा आमंत्रित करीत आहे. संभाव्य प्रस्तावक आरएफपीचे निविदा प्रपत्र बँकेची वेबसाईट **www.bankofmaharashtra.in** वरून डाऊनलोड करून घेऊ शकतात.
प्रस्तावपूर्व बैठक **दि. 13/01/2025** रोजी **स. 11.00 वा.** आयोजित करण्यात आली आहे. आरएफपी सादर करण्याची अंतिम तारीख **दि. 27/01/2025, स. 11.00 पर्यंत आहे.** तांत्रिक निविदा **दि. 27/01/2025 स. 11.30 वा.** उघडण्यात येतील आणि प्रस्तावकांना त्यासाठी उपस्थित राहण्याची विनंती करण्यात येत आहे.
वरील निविदेसंदर्भातील इतर परिशिष्ट / शुद्धीपत्रक / विस्तारीत तारखा / स्पष्टीकरण /प्रस्तावकांच्या शंकांसंदर्भातील निरसन, हे सर्व फक्त बँकेची वेबसाईट **www.bankofmaharashtra.in** वर पोस्ट करण्यात येईल आणि यासंदर्भात कोणतीही स्वतंत्र अधिसूचना वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही.
उप महाव्यवस्थापक, निगमित सेवा विभाग

IDEMI
(A Govt. of India Society)
Ministry of Micro, Small & Medium Enterprises
Organized By IDEMI, Mumbai, Ministry of MSME, Govt of India
Government Certificate Professional Course on
Digital Marketing with AI
Course Duration: 2 Days | Course Date - 11,12 Jan 2025
Course Time-10.30 am to 5.00 pm
Venue: IDEMI Swatantryaveer Tatya Tope Marg, Chunabhatti, Sion, Mumbai-400 022
Email id : training@idemi.org Web : www.idemi.org Ph.: (022) 2405 0301/2/3/4
Contents : Introduction to AI, Chat GPT, Gemini. Google, AI Image & Video Creator, Instagram & Facebook (Organic & Paid Marketing), Linkedin Professional Use, Google Business Profile Creation, Youtube & Earnings, Search Engine Optimization (SEO)
For Technical Details: 9834360324
QR Code for Registration and payment:-
Regular Fees 4000+18% GST | Student Fees 2000+18% GST (Include Lunch & Tea)
For College students ID & Other Necessary documents required.
Documents required- Aadhar card Xerox ,educational proof
Contact: 9403566219,8007765693,8275181503, 9869087617

IDEMI
(Govt. of India Society)
Ministry of Micro, Small & Medium Enterprises
Organised by IDEMI Mumbai
Government Certificate Professional Course On
Export & Import Management
(FOREIGN TRADE POLICY AND BANKING EXPERTISE)
start your own business.
Date-11,12 January 2025 (2 Days) Time : 10.00 am to 5.00 pm
Venue: IDEMI, Swatantryaveer Tatya Tope Marg, Chunabhatti, Sion, Mumbai
AFTER SUCCESSFUL COMPLETION CERTIFICATE WILL BE ISSUED
Contents: How To Find Overseas Buyers, International Logistics, Foreign Currency Management, Export - Import Procedure & Documentation, Pricing, Government Schemes, Pre shipment & post shipment finance, Letter of credit.
Scan QR For Registration
Course fees- 4000/- +18 % GST
Student -2500/- + 18% GST
in the name of IDEMI, Mumbai (includes lunch & tea)
For Technical details-8975769272
For whom: Students, Businessman, Exporters & all interested candidates.
Call for Details in between 10 am to 6 pm:
Contact-9403566219,8007765693,8275181503,9869087617
Documents required : 2 passport photos, Adhar card xerox, Education proof xerox

ॲक्सिस बँक लि.
शाखा कार्यालय : १ ला मजला, माझदा टॉवर्स, त्र्यंबक नाका, जिल्हा परिषदेसमोर, जीपीओ रोड, नाशिक-४२२००१.
अपेंडिक्स-IV [रुल ८(१)] ताबा नोटीस
ज्याअर्थी खाली सही करणार **ॲक्सिस बँक लि.** अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३(१२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या **रूल ३** अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार/जामीनदार **१) श्री. गजेंद्र भुचन्ना कलाल, २) सौ. संगिता गजेंद्र कलाल , दोन्ही रा.** घर नं.६१२, नामदेव निवास, शेवगे दारणा रोड, भैरव नगर, संसारी गाव रोड, नाशिक-४२२४०१, **तसेच :** १, वैष्णव शक्ती सोसायटी, संसारी गाव, देवळाली कॅम्प, देवळाली, नाशिक- ४२२४०१, **तसेच :** फ्लॅट नं.१२, साई वैष्णव अपार्टमेंट, पद्मावती नगरच्या पुढे, प्रकल्प भ-मारुती मंदिर, दारणा शिवे रोड, संसारी गाव, नाशिक- ४२२४०१,यांना **दि. २२/१२/२०२१** रोजी मागणी नोटीस बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत नमूद केलेली **रु. ९,०७,२८७/- (रुपये नऊ लाख सात हजार दोनशे सत्ताऐंशी फक्त) दि. १८/१२/२०२१ रोजीची देय रक्कम पुढील करारानुसार व्याजदरासह देय तारखेपर्यंत,** अशी सर्व रक्कम सदर नोटीसीच्या तारखपासुन **६० दिवसांच्या** आत परत करावी.
कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार/जामीनदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्यामुळे विशेषत: वर नमूद केलेले कर्जदार तसेच सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या रूल ६ व ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून तसेच माननीय मुख्य न्यायदंडाधिकारी, नाशिक यानी **दि. १७/०१/२०२३** रोजीच्या **फौ.चौ. अर्ज क्र. १५७७/२०२२** संदर्भात जारी केलेल्या आदेशानुसार खाली नमुद केलेल्या मालमत्तेचा **दि. ०४ जानेवारी २०२५ रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.**
विशेषत: कर्जदार, जामीनदार तसेच सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की त्यांनी सदर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो **ॲक्सिस बँक लि.**, नाशिक, यांना येणे असलेली **रु. ९,०७,२८७/- (रुपये नऊ लाख सात हजार दोनशे सत्ताऐंशी फक्त) दि.१८/१२/२०२१ रोजीची देय रक्कम पुढील करारानुसार व्याजदरासह देय तारखेपर्यंत**, अशा सर्व रकमेच्या अधीन राहील.
सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सरफेसी ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३(८) अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.
स्थावर मालमत्तेचा तपशील
फ्लॅट नं.ए-१२ चे सर्व सामाईक भाग, कार्पेट क्षेत्रफळ ३२.६९ चौ.मी., तिसऱ्या मजल्यावर, 'साई वैष्णव अपार्टमेंट ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बिल्डिंग मध्ये, सर्वे नं.१९५/१०ए वर बांधलेले, मौजे.संसारी, ता.जि.नाशिक आणि खालीलप्रमाणे चर्तु:सीमा : पूर्व : १८ मीटर रोड, **पश्चिम :** फ्लॅट नं. ए-१३, **दक्षिण :** श्री. विष्णू गोडसे फील्ड, **उत्तर :** फ्लॅट नं.ए -११.
दिनांक : ०४/०१/२०२५ ठिकाण : संसारी, नाशिक (टिप : स्वैर भाषांतर तफावत पडल्यास मूळ इग्रजी ग्राह्य) सही/- अधिकृत अधिकारी, ॲक्सिस बँक लि.

equitas Equitas Small Finance Bank
इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि.
{पूर्वीची इक्विटास फायनान्स लि. म्हणून ज्ञात असलेली}
कॉर्पोरेट कार्यालय : नं. ७६९, स्पेन्सर प्लाझा, ४था मजला, फेज-II, अन्ना सलाय, चेन्नई, टीएन-६०० ००२.
ताबा सूचना [रुल ८(१) अंतर्गत - स्थावर मालमत्तेकरिता]
ज्याअर्थी, **मेसर्स इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी, सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट [ॲक्ट, २००२ (२००२चा ५४)] आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२च्या [रुल ३] यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत याखाली नमूद केलेल्या एकूण थकीत देणींची परतफेड करण्याकरिता याखाली नमूद केलेल्या ऋणकोंवर फर्माविणारी मागणी सूचना निर्गमित केली आहे. याखाली नमूद केलेले ऋणको विनिर्दिष्ट वेळेत रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्यामुळे, याद्वारा याखाली नमूद केलेल्या ऋणकोंना तसेच आम जनतेस सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट रुल्स, २००२च्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (४) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषकरून ऋणको आणि आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार रकमेवरील अन्य आकार व पुढील व्याज आणि **मेसर्स इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**च्या आकाराच्या विषयाधीन असेल. ''सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८)च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत.''

अ. क्र.	ऋणको/ हमीदाराचे नाव	सुरक्षित मत्तेचे वर्णन (स्थावर मालमत्ता)	मागणी सूचना तारीख व रक्कम	ताबा घेतल्याची तारीख
१	लोन नं. : SENSKII0401742 शाखा : नाशिक-२ ऋणकोचे नाव : श्री. अविनाश भाऊसाहेब वराडे हमीदारांची नावे : १) श्रीमती हर्षदा अविनाश वराडे २) श्री. सुमित भाऊसाहेब वराडे ३) श्रीमती संगीता भाऊसाहेब वराडे ४) श्री. सागर अशोक लहमगे	पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- सर्व्हे नं. ३८/१ए, २०० चौ.मी. त्यापैकी जमीन एरिया मोजमापाचा १०० चौ.मी. व येथे स्थित- मौजे नाशिक शहर, जिल्हा नाशिक-४२२ ००३. सीमा : उत्तर : गोदावरी बुरकुले यांची जमीन, दक्षिण : शांताराम मोरे यांची मिळकत, पूर्व : जाधव यांची मिळकत, पश्चिम : कॉलनी रोड व रामकृष्ण मोरे यांची मिळकत. उप-नोंदणी जिल्हा, उप-निबंधक क्लास-२ नाशिक २ आणि नोंदणी जिल्हा, नाशिकच्या मर्यादेत स्थित.	०९.२०.२०२४ व रक्कम रु. १०,०८,२७५/-	०२ जानेवारी २०२५

दिनांक : ०७.०१.२०२५
स्थळ : नाशिक
''सदर नोटिसीमध्ये नमूद केलेल्या सर्व मजकुराबाबतच्या अधिक सुस्पष्टतेसाठी इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध झालेली नोटीस ग्राह्य धरण्यात येईल.''
स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि.

TATA
टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : ११वा मजला, टॉवर 'ए', पेनिनसुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई-४०० ०१३.
शाखा कार्यालय : टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, ऑफिस नं. ४१, ४था मजला, बिझनेस बे, कुटे मार्ग, तिडके कॉलनी, नाशिक-४२२००२, महाराष्ट्र.
स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता सूचना
(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२च्या रुल ९(१) यासह वाचलेल्या रुल ८(६) अंतर्गत)
सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२च्या रुल ८(६) व रुल ९(१) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ३० दिवसीय ई-लिलाव सूचना.
आम जनतेस आणि विशेषकरून याखालील ऋणको/सह-ऋणको किंवा विशेषकरून त्यांचे विधि वारसदार/प्रतिनिधी (ऋणको) यांना याद्वारा सूचना देण्यात येते की, "टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि."कडे ("टीसीएचएफएल") गहाण असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा "टीसीएचएफएल"च्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आलेला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली नमूद केलेल्या ऋणको व सह-ऋणकोंकडील थकीत देणींच्या वसुलीकरिता **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय"** या तत्त्वावर **१०.०२.२०२५** रोजी करण्यात येणार आहे. राखीव किंमत व इसारा रक्कम ठेव खाली नमूद केली आहे. याद्वारा सूचना देण्यात येते की, विक्रीची तारीख पुढे ढकलणे/विक्री खंडित होणे न झाल्यास, उक्त सुरक्षित मत्ता/मालमत्तेची विक्री उक्त **१०.०२.२०२५** रोजी **दु. ०२.०० वा.** ई-लिलावाद्वारा करण्यात येणार आहे. ई-लिलावात सहभागी होण्याकरिता इरठेचा डिमांड ड्राफ्ट समाविष्ट मोहोरबंद लिफाफा, शाखेचा पत्ता "टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि." ऑफिस नं. ४१, ४था मजला, बिझनेस बे, कुटे मार्ग, तिडके कॉलनी, नाशिक-४२२००२, महाराष्ट्र येथे **०८.०२.२०२५** रोजी सायं. ०५.०० वा. पर्यंत किंवा तत्पूर्वी "टीसीएचएफएल"च्या प्राधिकृत अधिकारीकडे सादर करण्यात यावा.
सुरक्षित मत्ता/स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या संक्षिप्त तपशीलवार वर्णनानुसार "जसे आहे जेथे ज्या स्थितीत आहे" या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

अ. क्र.	लोन अका. नं.	ऋणको/ सह-ऋणको/ विधि वारसदार/ विधि प्रतिनिधी/ हमीदारांची नावे	मागणी सूचनेनुसार रक्कम	राखीव किंमत	इसारा रक्कम ठेव	ताब्याचा प्रकार	थकीत देणी रोजीप्रमाणे
१	TCHHL0601000100073053	श्री. अमित बाळासाहेब जाधव, श्रीमती कल्याणी अमित जाधव	रु. ४६,७७,९१२/- (रुपये शेहेचाळीस लाख सत्याहत्तर हजार नऊशे ब्याण्णव फक्त) व ११.०९.२०२४	रु. ५५,००,०००/- (रुपये पंच्चावन्न लाख फक्त)	रु. ५,५०,०००/- (रुपये पाच लाख पन्नास हजार फक्त)	सांकेतिक	रु. ४८,७५,०२३/- (रुपये अट्ठेचाळीस लाख पंच्याहत्तर हजार तेवीस फक्त)
स्थावर मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - मालमत्ता धारण केलेला फ्लॅट नं. ०७, मोजमापाचा बिल्ट-अप एरिआ ८००.०० चौ.फू. + ओपन स्पेस ६०० चौ.फू. व येथे स्थित - "अजिंक्यतारा अपार्टमेंट"मधील चौथ्या मजल्यावरील, सर्व्हे नं. ४८/२/२, त्यापैकी प्लॉट नं. ६, आनंदवल्लीचा, नाशिक म्युनिसिपल कॉर्पोरेशन, नाशिकच्या मर्यादेत.							
२	9927388 & 10684012 & TCHIN0601000100069536	श्री. राजेश अशोक गाडे, श्रीमती लक्ष्मी राजेश गाडे	रु. ३,५७,०५४/- (रुपये तीन लाख सत्तावन्न हजार चौपन्न फक्त) करारनामा क्र. TCHIN060100010006 9536 अंतर्गत तुमच्याद्वारे देय व देणी आहे व रक्कम रु. ७,८६,९६८/- (रुपये सात लाख शहाऐंशी हजार नऊशे अडसष्ट फक्त) करारनामा क्र. 10684012 अंतर्गत तुमच्याद्वारे देय व देणी आहे व रक्कम रु. १४,२१,९४२/- (रुपये चौदा लाख एकवीस हजार नऊशे बेचाळीस फक्त) करारनामा क्र. 9927388 अंतर्गत व एकूण रुपये रु. २५,६५,९६४/- (रुपये पंचवीस लाख पासष्ट हजार नऊशे चौसष्ट फक्त) तुमच्याद्वारे देय व देणी आहे व १२.०९.२०२४	रु. ३२,९५,५००/- (रुपये बत्तीस लाख पंचाण्णव हजार पाचशे फक्त)	रु. ३,२९,५५०/- (रुपये तीन लाख एकोणतीस हजार पाचशे पन्नास फक्त)	सांकेतिक	रु. ३,५७,०५४/- (रुपये तीन लाख सत्तावन्न हजार चौपन्न फक्त) करारनामा क्र. TCHIN06010001000 69536 अंतर्गत तुमच्याद्वारे देय व देणी आहे व रक्कम रु. ८,२१,११६/- (रुपये आठ लाख एकवीस हजार एकशे सोळा फक्त) करारनामा क्र. 10684012 अंतर्गत तुमच्याद्वारे देय व देणी आहे व रक्कम रु. १४,६२,४७५/- (रुपये चौदा लाख बासष्ट हजार चारशे पंचाहत्तर फक्त) करारनामा क्र. 9927388 अंतर्गत व एकूण रुपये रु. २६,५९,१५५/- (रुपये सव्वीस लाख एकोणसाठ हजार एकशे पंचावन्न फक्त) तुमच्याद्वारे देय व देणी आहे
स्थावर मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत